॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon



'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)

## जनसंपर्क विभाग

जळगाव १३, (प्रतिनिधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या रसायनशास्त्र प्रशाळेच्या वतीने दि. १८ व १९ सप्टेंबर रोजी "रसायनशास्त्र आणि तंत्रज्ञानातील नवीनतम विकासासाठी जागतिक संधी (GOLD CT)" या विषयावर दुसरी अंतरराष्ट्रीय परिषद होणार असून यामध्ये ६०० पेक्षा अधिक संशोधक,तज्ज्ञ, उद्योजक व विद्यार्थी सहभागी होणार आहेत.

रसायनशास्त्र प्रशाळेतील प्रोफेसर तथा विद्यापीठाचे माजी प्र-कुलगुरु प्रा.पी.पी. माहुलीकर हे सप्टेंबर महिन्याअखेर सेवानिवृत्त होत असून त्यांच्या सेवेचा गौरव करण्यासाठी ही आंतरराष्ट्रीय परिषद होणार आहे. या परिषदेचे उद्घाटन बुधवार दि. १८ सप्टेंबर रोजी आयसीटी मुंबईचे माजी कुलगुरु प्रा.जी.डी.यादव यांच्या हस्ते होणार असून ते यावेळी बीजभाषण करणार आहेत. कुलगुरु प्रा. व्ही.एल.माहेश्वरी अध्यक्षस्थानी राहतील. या आंतरराष्ट्रीय परिषदेसाठी ६१० जणांनी नोंदणी केली आहे. यामध्ये १८३ पदव्युत्तर विद्यार्थी, २२६ संशोधक विद्यार्थी, १८७ ॲकेडमीशीयन, ७ उद्योजक आदींचा समावेश आहे. परदेशातील ६ तज्ज्ञ देखील या परिषदेत सहभागी होतील. त्यामध्ये दक्षिण आफ्रिकेतील प्रा.श्रीकांता जोन्नलगड्डा, दक्षिण कोरीयातील प्रा. सोहन देओन, मेक्सीकोतील डॉ. मार्टीनेज, डॉ.प्रियंका मक्कर आदींचा समावेश आहे. सिनेट सभागृह, पर्यावरणशास्त्र प्रशाळेचे सभागृह, दृकश्राव्य सभागृह आणि रसायनशास्त्र प्रशाळेचे सभागृह या चार ठिकाणी समांतर सत्र होणार आहेत.

या परिषदेसाठी गुजरात, राजस्थान, उत्तरप्रदेश, हिमाचल प्रदेश, पंजाब, दिल्ली, जम्मु-कश्मिर, आंध्र प्रदेश, तेलंगणा,कर्नाटक,गोवा, मध्यप्रदेश व महाराष्ट्रातील विविध विद्यापीठातून संशोधक, विद्यार्थी, शास्त्रज्ञ, प्राध्यापक उपस्थित राहणार आहेत. रसायनशास्त्रातील जवळपास २४ उपविषयांवर या परिषदेत चर्चा होणार आहे. या परिषदेत २२६ पोस्टर व ६० मौखिक शोधनिबंध सादर होणार आहेत. भारताच्या विविध प्रांतामधून येणाऱ्यांमध्ये डॉ.पी.पी. वडगावकर, प्रा.व्ही.आर.पाटील, डॉ.बुबन बॅनर्जी,डॉ.अंकुश बिरादार, प्रा.आर.के. शर्मा, प्रा.बाबासाहेब शंकपाळ, प्रा.के.के.शर्मा, डॉ.एस.व्ही.भोसले, प्रा.एन.के.कराडे, डॉ.दिनेश सावंत, डॉ.शेषनाथ भोसले,डॉ.एस.एल.सोनवणे, डॉ.साजल दास, डॉ.एस.एम.माने, प्रा.अविनाश कुंभार, डॉ. पंकज कोईनकर , डॉ.एस.एच.सोनवणे, डॉ.मिलिंद देशमुख, प्रा.नरिंदरसिंग, प्रा.बिश्वजित सिन्हा,डॉ.निरंजन येवले, प्रा.एन.एन.कराडे, डॉ.अपूर्बा, कोनेर, डॉ.बापूराव शिंगाटे, प्रा.राम माने, डॉ.डी.एम.बडगुजर, डॉ.रोहन एरंडे, आदींचा समावेश आहे. परिषदेचा समारोप १९ सप्टेंबर रोजी दुपारी होणार असून प्रा.पी.पी.माहुलीकर यांचा सत्कार या दिवशी होणार आहे. अशी माहिती प्रशाळेच संचालक प्रा.डी.एच.मोरे व निमंत्रक प्रा.डी.एस.दलाल यांनी दिली. कुलगुरु प्रा.व्ही.एल.माहेश्वरी यांच्या अध्यक्षतेखाली या परिषदेच्या पूर्वतयारीचा आढावा घेण्यात आला. यावेळी प्र-कुलगरु एस.टी.इंगळे,कुलसचिव डॉ.विनोद पाटील, प्रा.पी.पी.माहुलीकर, प्रा.रत्नमाला बेंद्रे, डॉ.अमरदीप पाटील आदी उपस्थित होते.

.................................................................................................................................

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२४ दिनांक: १३ सप्टेंबर, २०२४

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी